महाराष्ट्र शासन
नगर परिषद प्रशासन
जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मार्ग, अकोला-४४४००१
Email ID : dudaakola@gmail.com Website : https://akola.gov.in

क्र.कक्ष-६/नपाप्र/प्रस/ससेपदभरती/ कावि- 120 दिनांक 25/11/2026

जाहिरात

अकोला जिल्ह्यातील अकोट, मूर्तिजापूर, बाळापूर, तेल्हारा, हिवरखेड, पातूर नगर परिषदा व बार्शीटाकळी नगर पंचायतच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या गट-क व गट-ड संवर्गातील एकूण १०३ रिक्त पदे सरळसेवेने (नामनिर्देशनाने) भरण्याकरिता आयोजित परीक्षेसाठी या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पदाची शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता व इतर अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

अ.क्र.	तपशील	दिनांक
१	परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकृतीचा कालावधी	दि. २६ / ११ / २०२६ ते दि. १७/१२/ २०२६
२	ऑनलाईन पद्धतीने विहीत परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	दि. १७/१२/२०२६
३	परीक्षेकरिता प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक	akola.gov.in या अधिकृत संकेतस्थळा वर उपलब्ध करुन देण्यात येईल
४	ऑनलाईन परीक्षेचा दिनांक	

१.१ वरील पदभरतीसाठी संवर्गनिहाय परीक्षा ऑनलाईन पद्धतीने (Computer Based Test) विहीत करण्यात येणाऱ्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेता एकापेक्षा अधिक सत्रांत परीक्षा घेतल्यास Normalization (समानीकरण) पद्धतीने गुणांक निश्चित केले जातील.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

१.२. भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व अद्ययावत सूचना केवळ जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचे अधिकृत संकेतस्थळ (https://akola.gov.in) व संबंधित भरती पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येतील. वैयक्तिकरित्या पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२. अकोला जिल्ह्यातील नगरपरिषदांतील संवर्गनिहाय पदांचा तपशील

अ.क्र.	पदाचे नाव	संवर्ग	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रु.)	भरावयाची पद संख्या
१	कनिष्ठ लिपिक / लिपिक टंकलेखक (Junior Clerk / Clerk-Typist)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	१३
२	लघु टंकलेखक (Stenographer)	गट-क	एस-८ : रु. २५,५०० - ८१,१००	०१
३	वाहन चालक (Driver)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०५
४	उद्यान पर्यवेक्षक (Garden Supervisor)	गट-क	एस-८ : रु. २५,५०० - ८१,१००	०२
५	सहाय्यक ग्रंथपाल (Assistant Librarian)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०२
६	गाळणी चालक (Filter Operator)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०५
७	जोडारी (Fitter)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०६
८	वीजतंत्री (Electrician)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०४
९	पंप ऑपरेटर / पंप चालक (Pump Operator)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०८
१०	तारतंत्री (Wireman)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०४
११	वाहन चालक कम ऑपरेटर (Driver-cum-Operator)	गट-क	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	०५
१२	अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer)	गट-ड	एस-६ : रु. १९,९०० - ६३,२००	२२
१३	शिपाई (Peon)	गट-ड	एस-१ : रु. १५,००० - ४७,६००	२४
१४	व्हालमन (Valveman)	गट-ड	एस-१ : रु. १५,००० - ४७,६००	०२
	एकूण रिक्त पदे			१०३

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

२.१. संवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २७ फेब्रुवारी, २०२४ च्या तरतुदींनुसार बिंदुनामावली प्रमाणित केल्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षण खालीलप्रमाणे राहील:

१) पदनाम: **कनिष्ठ लिपिक / लिपिक टंकलेखक** (Clerk-Typist) – भरावयाची रिक्त पदे: १३

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	०३	०३	००	००	००	०१	००	०२	०१	११	०२	१३
सर्वसाधारण	०१	०२	०२	००	००	००	०१	००	०१	०१	०८	०१	०९
महिला आरक्षण (३०%)	००	०१	०१	००	००	००	००	००	०१	००	०३	०१	०४
माजी सैनिक (१५%) / खेळाडू (५%) / प्रकल्पग्रस्त (५%) / भूकंपग्रस्त (२%) / अंशकालीन (१०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०१ (पात्र प्रवर्ग: LV, D, HH, OA, OL, BL, CP, LC, Dw, AAV, ASD(M), SLD, MI, MD) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

२) पदनाम: लघु टंकलेखक (Stenographer) – भरावयाची रिक्त पदे: ०१

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
सर्वसाधारण	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
महिला / माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

३) पदनाम: वाहन चालक (Driver) – भरावयाची रिक्त पदे: ०५

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	०१	०१	००	००	००	०१	००	०१	००	०५	००	०५
सर्वसाधारण	०१	०१	०१	००	००	००	०१	००	०१	००	०५	००	०५
महिला / माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

४) पदनाम: उद्यान पर्यवेक्षक (Garden Supervisor) – भरावयाची रिक्त पदे: ०२

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०२	०२
सर्वसाधारण	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

५) पदनाम: सहाय्यक ग्रंथपाल (Assistant Librarian) – भरावयाची रिक्त पदे: ०२

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०२	०२
सर्वसाधारण	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

६) पदनाम: गाळणी चालक (Filter Operator) – भरावयाची रिक्त पदे: ०५

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	००	०१	००	००	००	००	००	००	००	००	०१	०४	०५
सर्वसाधारण	००	०१	००	००	००	००	००	००	००	००	०१	०२	०३
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी सैनिक (१५%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

७) पदनाम: जोडारी (Fitter) – भरावयाची रिक्त पदे: ०६

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	००	०१	००	०१	००	०१	००	००	००	०४	०२	०६
सर्वसाधारण	०१	००	०१	००	०१	००	०१	००	००	००	०४	०१	०५
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

८) पदनाम: **वीजतंत्री** (Electrician) – भरावयाची **रिक्त** पदे: ०४

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०३	०४
सर्वसाधारण	०१	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०२	०३
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी **सैनिक** / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू **नाही**) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

९) पदनाम: पंप ऑपरेटर / पंप चालक (Pump Operator) – भरावयाची **रिक्त** पदे: ०८

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	०१	००	००	००	०१	०१	००	०१	०१	०६	०२	०८
सर्वसाधारण	०१	०१	००	००	००	०१	०१	००	०१	०१	०६	०१	०७
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी **सैनिक** / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू **नाही**) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

१०) पदनाम: **तारतंत्री** (Wireman) – भरावयाची **रिक्त** पदे: ०४

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०२	००	०१	००	००	००	००	००	००	००	०३	०१	०४
सर्वसाधारण	०१	००	०१	००	००	००	००	००	००	००	०२	०१	०३

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
महिला आरक्षण (३०%)	०१	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	००	०१
माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

११) पदनाम: वाहन चालक कम ऑपरेटर (Driver-cum-Operator) – भरावयाची रिक्त पदे: ०५

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०१	०१	०१	००	००	००	००	००	००	००	०३	०२	०५
सर्वसाधारण	०१	०१	०१	००	००	००	००	००	००	००	०३	०१	०४
महिला आरक्षण (३०%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	०१	०१
माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

१२) पदनाम: अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer) – भरावयाची रिक्त पदे: २२

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०५	००	०५	००	००	००	०५	००	०१	००	१६	०६	२२
सर्वसाधारण	०१	००	०१	००	००	००	०१	००	०१	००	०४	०२	०६
महिला आरक्षण (३०%)	०२	००	०२	००	००	००	०२	००	००	००	०६	०२	०८

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
माजी सैनिक (१५%)	०१	००	०१	००	००	००	०१	००	००	००	०३	०१	०४
खेळाडू (५%) / प्रकल्पग्रस्त (५%) / भूकंपग्रस्त (२%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
पदवीधर अंशकालीन (१०%)	०१	००	०१	००	००	००	०१	००	००	००	०३	०१	०४
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

१३) पदनाम: शिपाई (Peon) – भरावयाची रिक्त पदे: २४

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	०२	०६	०१	०२	००	०१	०३	००	०३	०३	२१	०३	२४
सर्वसाधारण	०१	०२	०१	०१	००	०१	०२	००	०२	०२	१२	०२	१४
महिला आरक्षण (३०%)	०१	०२	००	०१	००	००	०१	००	०१	०१	०७	०१	०८
माजी सैनिक (१५%)	००	०१	००	००	००	००	००	००	००	००	०१	००	०१
खेळाडू (५%) / प्रकल्पग्रस्त (५%) / भूकंपग्रस्त (२%)	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
पदवीधर अंशकालीन (१०%)	००	०१	००	००	००	००	००	००	००	००	०१	००	०१
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०१ (पात्र प्रवर्ग: D, HH, OA, OL, BL, LC, Dw, AAV, SLD, MI, MD) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

१४) पदनाम: व्हालमन (Valveman) – भरावयाची रिक्त पदे: ०२

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
एकूण पदे	००	००	०१	००	००	००	००	००	००	००	०१	०१	०२
सर्वसाधारण	००	००	०१	००	००	००	००	००	००	००	०१	०१	०२

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

प्रवर्ग / समांतर आरक्षण	अजा (SC)	अज (ST)	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	इमाव (OBC)	विमाप्र (SBC)	SEBC	EWS	एकूण आरक्षित	अराखीव (Open)	एकूण पदे
महिला / माजी सैनिक / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००	००
दिव्यांग (४%) : एकूण पदे - ०० (लागू नाही) | अनाथ (१%) : एकूण पद - ००													

३. पदसंख्या व आरक्षणा संदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

३.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल (कमी/जास्त) होण्याची शक्यता आहे.

३.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

३.३ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domicile) असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिला २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ०४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांवरती निवडी करीता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांवरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.४ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

३.५ अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जाती/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

३.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०१२/प्र.क्र. ९६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, शासन

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला सत्यमेव जयते

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

परिपत्रक क्र. संकिर्ण-१११८/प्रक्र ३९/१६-अ, दि. १९ डिसेंबर २०१८ आणि सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. राआधो ४०२४/प्रक्र. १४/१६-अ मंत्रालय, मुंबई दि. २० जानेवारी २०२४ व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.७ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो- ४०१९/प्रक्र ३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व दिनांक ३१ मे २०२१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

३.८ शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्रक्र१८२/विजाभज-१, दि. २५ मार्च २०१३ अन्वये विहित कार्यपद्धती नुसार तसेच शासन शुद्धीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

३.९ शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्रक्र१८२/विजाभज-१, दि. १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

३.१० सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दि. २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दि. २७ फेब्रुवारी २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित निवड व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील.

३.११ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/प्रक्र७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून, शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०२४/प्रक्र७५/आरक्षण-५ दि २८ जून २०२४ व ०५ जुलै २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३.१२ शासन शुद्धीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०२३/प्रक्र.७६/मावक दिनांक ०९ मार्च २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३.१३ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदांवरील निवडी करीता विचार करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हाधिकारी कार्यालय
सत्यमेव जयते
अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

३.१४ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्व साधारण पदांवरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित उपलब्ध नसेल तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३.१५ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसामान्य रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसामान्य रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

३.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा योग्य सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित कायदा नियम आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

३.१७ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी, अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३.१८ **खेळाडू आरक्षण:-**

३.१८.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्रक्र. ६८ क्रीसुसे-२, दिनांक १ जुलै २०१६ तसेच शासन शुद्धीपत्रक, दिनांक १८ ऑगस्ट २०१६, शुद्धीपत्रक दिनांक १० ऑक्टोबर २०१७, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण- १७१६/प्रक्र१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

३.१८.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडाविषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राप्त खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३.१८.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे, अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

३.१८.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

३.१८.५ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

३.१९ दिव्यांग आरक्षण :-

३.१९.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्रक्र.११४/१८-अ दिनांक २१ मे २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

३.१९.२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. संकिर्ण १०२१/प्रक्र. ५७/२१/वेसेवा-१ दिनांक १७ जून २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार गट-ड (वर्ग-४) या संवर्गाची समकक्ष पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहेत. सदर पदाचा तपशील (परिशिष्ट-१) akola.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

३.१९.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

३.१९.४ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३.१९.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर निवड/नियुक्त्या करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची निवड/नियुक्ती करण्यात येईल.

३.१९.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयीसवलतींसाठी पात्र असतील.

३.१९.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:- अ. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पदे लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयीसवलती. ब. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पदे संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयीसवलती.

३.१९.८ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्रक्र४६/आरोग्य-६ दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्रशासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
स. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

३.१९.९ दिव्यांग उमेदवाराने अर्ज करताना शासन परिपत्रक दिव्यांग कल्याण विभाग क्रमांक दिव्यांग-२०२४/प्रक्र. ८६/दि.क.२ दिनांक २७ जून २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे.

३.१९.१० दिव्यांग उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उपप्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

३.२० अनाथ आरक्षण:-

३.२०.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्रक्र./१२२/का-०३ दिनांक ०६ एप्रिल २०२३, व समक्रमांकाचे शासन पूरकपत्र दिनांक १० मे २०२३, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक राआधो ४०२४/प्रक्र. १४/१६-अ मंत्रालय मुंबई २० जानेवारी २०२४ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

३.२०.२ अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बालविकास विभाग यांच्याकडील सक्षम प्राधिकारी यांचे विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

३.२०.३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात सहा महिन्याच्या कालावधीत आयुक्त बालविकास, पुणे यांच्याकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेणे आवश्यक राहील.

३.२०.४ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवाराचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

३.२१ माजी सैनिक आरक्षण:-

३.२१.१ गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास, मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ दिनांक २ सप्टेंबर १९८३ नुसार: अ. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास अशा माजी सैनिकास १५ टक्के राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील. ब. युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाणे १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

नियुक्तीस पात्र राहील तथापि सदर उमेदवाराने जाहिरातीत नमूद गट-ड (वर्ग-४) पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३.२२ **प्रकल्पग्रस्त आरक्षण:-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २० जानेवारी १९८० तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तासाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र/कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

३.२३ **भूकंपग्रस्त आरक्षण:-** गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र/कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

३.२४ **पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांचेकरीता आरक्षण:-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-१००९/प्रक्र२००/२००९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ व क्रमांक अशंका-१९१३/प्रक्र५७/२०१३/१६-अ दिनांक १९.०९.२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४. पदाच्या निवडीसाठी कार्यपद्धती, आवश्यक कागदपत्रे तसेच महत्त्वाच्या अटी व शर्ती (सर्व उमेदवारांसाठी):-

४.१ जाहिरातीमध्ये नमूद गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील पदांसाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.

४.२ शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्रक्र६६/२०११/ई-१० दिनांक १७ जून २०११ नुसार ज्या परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्मदाखला (Birth Certificate) किंवा जन्म महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असलेला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतु महाराष्ट्र राज्यातील रहिवासी सलग १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे, अशा परीक्षार्थी उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

४.३ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

४.४ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडी अंती विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

४.५ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्रक्र. १०६४/२०११/१६ दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

४.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. परीक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर उपस्थित राहावे.

४.७ नियुक्त होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक २१.१०.२००५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील.

४.८ सदर भरती प्रक्रिया जिल्हास्तरावरून एकत्रित रित्या राबविली जात असली तरी, गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) समकक्ष पदे व इतर संवर्गातील यादी तयार करण्यात येऊन, त्यानुसार या कार्यालयाकडून शिफारस पत्र देण्यात येतील. उमेदवारांना गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

४.९ निवड सूचीतील पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी अंती वैद्यकीय व चारित्र्य पडताळणी पूर्ण करून नियुक्ती पत्र देण्यात येतील. नियुक्ती बाबतचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना असतील.

४.१० अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे तपासण्यात येतील. मूळ प्रती उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास अपात्र ठरवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

५. शैक्षणिक अर्हता:-

५.१. गट-क पदे-

	पदनाम व श्रेणी	सुधारित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता	अनुभव, व इतर अनिवार्य अटी
	लिपिक-टंकलेखक	• मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. • राज्य शासनाची टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र: मराठी ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी ४० श.प्र.मि.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

	पदनाम व श्रेणी	सुधारित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता	अनुभव, व इतर अनिवार्य अटी
	लघुटंकलेखक	• मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. • राज्य शासनाची लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण: **मराठी** ८० श.प्र.मि. **आणि इंग्रजी** ८० श.प्र.मि. • टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र: **मराठी** ३० श.प्र.मि. **आणि इंग्रजी** ४० श.प्र.मि.	• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.
	वाहन चालक	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण.	• वैध हलके वाहन (LMV) चालविण्याचा परवाना आवश्यक. • मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.
	उद्यान पर्यवेक्षक	• मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.**एस्सी.** (**हॉर्टिकल्चर** / **ॲग्रीकल्चर** / **फॉरेस्ट्री**) पदवी **किंवा** मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.**एस्सी. (वनस्पतीशास्त्र** / Botany) पदवी.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.
	सहायक ग्रंथपाल	• मान्यताप्राप्त विद्यापीठाची B.LIB (ग्रंथालय शास्त्र) शाखेची पदवी.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. पदव्युत्तर पदवी (एम.लिब. / M.Lib.) धारकांना प्राधान्य राहील.
	गाळणी चालक	• गाळणी चालक: शासनमान्य विद्यापीठाचा विज्ञान शाखेचा **रसायनशास्त्र** (Chemistry) विषयातील पदवीधर.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.
	जोडारी	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (ITI) **जोडारी**(fitter trade) विषयाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण प्रमाणपत्र.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.
	वीजतंत्री	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (ITI) **वीजतंत्री** विषयाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण प्रमाणपत्र.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.
	पंप ऑपरेटर	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (ITI) पंप ऑपरेटर अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

	पदनाम व श्रेणी	सुधारित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता	अनुभव, व इतर अनिवार्य अटी
	तारतंत्री (वायरमन)	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (ITI) **तारतंत्री** (वायरमन) अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.	• मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.
	वाहन चालक कम ऑपरेटर (**यंत्र** चालक)	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र **किंवा** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचा ६ **महिन्यांचा अग्निशमन प्रशिक्षण** पाठ्यक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा (MSBTE) २ **वर्षांचा अग्निशमन कोर्स** उत्तीर्ण प्रमाणपत्र.	• परवाना: वैध जड वाहन (HMV) चालविण्याचा परवाना **आवश्यक** • **शारीरिक पात्रता**: उंची १६५ से.मी. (महिला: १५ से.मी.); छाती ८१ से.मी. + फुगवून ५ से.मी. जास्त (महिलांना लागू नाही); वजन ५० कि.ग्रॅ. (महिला: ४६ कि.ग्रॅ.); दृष्टी विना चष्मा ६/६ व Ishihara Chart नुसार चांगली रंगदृष्टी. • मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

५.२. गट-ड पदे-

	पदनाम व श्रेणी	सुधारित शैक्षणिक व तांत्रिक अर्हता	अनुभव, वयोमर्यादा व इतर अनिवार्य अटी
	अग्निशामक विमोचक (फायरमन)	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र **किंवा** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचा ६ **महिन्यांचा अग्निशमन प्रशिक्षण** पाठ्यक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा (MSBTE) २ **वर्षांचा अग्निशमन कोर्स** उत्तीर्ण प्रमाणपत्र.	• **शारीरिक पात्रता**: उंची १६५ से.मी. (महिला: १५७ से.मी.); छाती ८१ से.मी. + फुगवून ५ से.मी. **जास्त** (महिलांना लागू नाही); वजन ५० कि.ग्रॅ. (महिला: ४६ कि.ग्रॅ.); दृष्टी विना चष्मा ६/६ व Ishihara Chart नुसार चांगली रंगदृष्टी. • मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.
	शिपाई	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण.	• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.
	व्हालमन	• महाराष्ट्र राज्य मंडळाची **माध्यमिक** शालांत **प्रमाणपत्र परीक्षा** (S.S.C.) १० वी उत्तीर्ण. • शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (ITI) (Plumber) विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.	• मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

६. पात्रता व वयोमर्यादा:-

६.१ भारतीय नागरिकत्व

६.२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक: २६.११.२०२६

६.२.२ विविध अराजपत्रित प्रवर्ग उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा:

जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय खालीलप्रमाणे असणे आवश्यक राहील:

१. सर्वसाधारण वयोमर्यादा (अग्निशामक विमोचक व वाहन चालक कम ऑपरेटर ही पदे वगळून उर्वरित सर्व १२ पदांसाठी):

किमान वयोमर्यादा: १८ वर्षे

कमाल वयोमर्यादा – अराखीव (खुला प्रवर्ग): ३८ वर्षे

कमाल वयोमर्यादा – मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., सा.शै.मा.प्र. (SEBC), इ.मा.व. (OBC) व आ.दु.घ. (EWS)): ४३ वर्षे

२. अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer) व वाहन चालक कम ऑपरेटर (Driver-cum-Operator) या पदांसाठी वयोमर्यादा:

किमान वयोमर्यादा: १८ वर्षे

कमाल वयोमर्यादा – अराखीव (खुला प्रवर्ग): ३० वर्षे

कमाल वयोमर्यादा – मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, SEBC, OBC व EWS): ३३ वर्षे

३. विशेष / समांतर आरक्षण प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा सवलत:

दिव्यांग उमेदवार (Divyang / PwD): लिपिक टंकलेखक व शिपाई या पदांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील (शासन नियमानुसार व पदाच्या पात्रतेनुसार).

अंशकालीन कर्मचारी (Part-Time Employee): शिपाई व अग्निशामक विमोचक या पदांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

माजी सैनिक (Ex-Servicemen): संबंधित उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या एकूण सेवा कालावधी इतकी वर्षे अधिक ३ वर्षे इतकी सवलत अनुज्ञेय राहील (गाळणी चालक, शिपाई व अग्निशामक विमोचक पदांसाठी).

प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य / प्राविण्यप्राप्त खेळाडू / अनाथ: महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार व संवर्गनिहाय उपलब्ध पदसंख्येनुसार कमाल वयोमर्यादेतील सवलत लागू राहील.

५. महत्त्वाच्या अटी व टिपा:

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला सत्यमेव जयते

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

वयाची गणना जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास करण्यात येईल.

वयोमर्यादेतील सवलत मिळवण्यासाठी वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., सा.शै.मा.प्र. (SEBC), इ.मा.व. (OBC) या प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले वैध नॉन-क्रीमीलेअर (Non-Creamy Layer) प्रमाणपत्र तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) उमेदवारांनी वैध EWS पात्रता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

एखाद्या उमेदवारास एकापेक्षा जास्त प्रकारची वयोमर्यादा सवलत लागू होत असल्यास, त्यापैकी जी कमाल वयोमर्यादा अधिक असेल तीच सवलत लागू राहील.

७.परीक्षेचे स्वरूप व त्या अनुषंगिक सूचना:-

• परीक्षा कालावधी: २ तास (१२० मिनिटे)

१) परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पद्धतीने घेण्यात येईल.

२) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील.

३) प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास ०२ गुण असतील.

4) सर्व इच्छुक उमेदवारांच्या माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी akola.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पद व संवर्गनिहाय सविस्तर अभ्यासक्रम, विहित परीक्षा पद्धती आणि आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता निकष उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अर्जदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करण्यापूर्वी आपापल्या पदांसाठी लागू असलेले वयोमर्यादेचे निकष, शैक्षणिक अर्हता, आवश्यक अनुभव आणि निवड प्रक्रियेसंबंधीच्या विहित मार्गदर्शक तत्त्वांचे सखोल वाचन करावे.

५) या पदांकरीता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाही.

६) निवडसूची शा.नि. दि. १६.०३.१९९९, १९.१२.२०१८ व ४ मे २०२२ अन्वये तयार करण्यात येईल.

७) गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

८) समान गुण असल्यास प्राधान्य क्रम शासन निर्णय दि. ४ मे २०२२ मधील निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

९) एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित केल्यास TCS कंपनीच्या सूत्रानुसार गुणांचे समानीकरण (Normalization) करण्यात येईल.

८. विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे संलग्न (Upload) करणे:-

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला सत्यमेव जयते

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे PDF फाईल फॉरमॅटमध्ये संलग्न (Upload) करावीत. लागू असलेली खालील कागदपत्रे संलग्न करणे अनिवार्य आहे:

अ.क्र.	प्रमाणपत्र/कागदपत्र	अ.क्र.	प्रमाणपत्र/कागदपत्र
१	अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम)	९	खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
२	वयाचा पुरावा	१०	प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
३	शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा	११	भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
४	सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीय असल्याचा पुरावा	१२	अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा पुरावा
५	आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) पुरावा	१३	एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा
६	अंतिम दिनांकास वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र	१४	विविध आरक्षणासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile)
७	पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा	१५	अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
८	पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा	१६	मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९. सर्वसाधारण सूचना, परीक्षा शुल्क व वेळापत्रक:-

१. अर्ज फक्त ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे akola.gov.in या संकेतस्थळावर स्वीकारण्यात येतील.

२. परीक्षा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

९.२ परीक्षा शुल्क (Non-refundable):

अ.क्र.	पदाचे नाव	खुला प्रवर्ग	राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग व आ.दु.घ.)
१	गट-क व गट-ड समकक्ष पदे व इतर संवर्ग	रु. १०००/- (अक्षरी रु. एक हजार मात्र)	रु. ९००/- (अक्षरी रु. नऊशे मात्र)

टीप: माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय अकोला सत्यमेव जयते

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

१०. दिव्यांग उमेदवार:- लेखनिक व अनुग्रह कालावधी बाबत:-

१०.१ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी सवलती शासन निर्णय दि. ०५ ऑक्टोबर २०२१ मधील मार्गदर्शिका-२०२१ नुसार देण्यात येतील.

१०.२ लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयाकडे लेखी विनंती करून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. लेखनिकाची व्यवस्था उमेदवाराने स्वतः करावी.

११. निवड सूचीची कालमर्यादा:-

निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा ज्या दिनांकापर्यंतची पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत (जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत) विधिग्राह्य राहील. शिफारस केलेला उमेदवार विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा अपात्र ठरल्यास प्रतीक्षा यादीतील उमेदवारांमधून ज्येष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने पदे भरण्यात येतील.

१२ व १३. प्रवेश प्रमाणपत्र व परीक्षेस प्रवेश:-

• प्रवेश प्रमाणपत्रे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे १० दिवस अगोदर akola.gov.in वर उपलब्ध करून देण्यात येतील. ३ दिवस अगोदर प्राप्त न झाल्यास टीसीएस मदत कक्षाकडे संपर्क साधावा.

• परीक्षेच्या वेळी स्वतःचे मूळ ओळखपत्र (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड ड्रायव्हिंग लायसन्स) व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

• परीक्षा सुरू होण्यापूर्वी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर २ तास अगोदर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर प्रवेश दिला जाणार नाही.

१४. गैरप्रकार व अन्य कार्यवाही:-

परीक्षेत गैरप्रकार किंवा गैरप्रकाराचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांवर फौजदारी अभियोग दाखल करून निवड प्रक्रियेतून कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येईल. परीक्षा केंद्रावर मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, ब्लूटूथ, कॅल्क्युलेटर व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणण्यास सक्त मनाई आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

15. Mandatory Time-Bound Groups in Exams 2026 / अनिवार्य वेळ-बद्ध विभाग

1. It has been decided to introduce mandatory time-bound groups in all its MCQ-Based examinations conducted on a computer-based platform to enhance security and sanctity.

(संगणक-आधारित प्लॅटफॉर्मवर आयोजित केलेल्या सर्व MCQ आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य वेळ-बद्ध विभाग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.)

2. Candidates cannot proceed to the next group until the allotted time for the previous group is completed, nor can they review or modify responses of a completed group.

(मागील विभागाचा वेळ पूर्ण झाल्याशिवाय पुढील विभागात जाता येणार नाही तसेच पूर्ण झालेल्या विभागातील उत्तरे बदलता येणार नाहीत.)

3. Questions marked for review within an active group will be evaluated. (पुनरावलोकनासाठी चिन्हांकित केलेल्या प्रश्नांचे मूल्यमापन केले जाईल.)

About Normalization (Mean Standard Deviation Method): For exams conducted across multiple shifts, scores will be normalized up to 5 decimal places using the formula: M_ij = [(M_t^g - M_q^g) / (M_ti - M_iq)] * (M_ij - M_iq) + M_q^gm.

१६. महत्त्वाच्या सूचना व संपर्क (Help Desk)

---

१. अर्ज फक्त ऑनलाईन प्रणालीद्वारेच स्वीकारले जातील. अर्जासोबत १० वी प्रमाणपत्र, पदवी/ITI/प्रशिक्षण प्रमाणपत्र, अधिवास/जन्म प्रमाणपत्र, जात/नॉन-क्रिमीलेअर/EWS प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र व फोटो ओळखपत्र (१०० KB ते १ MB दरम्यान PDF/JPG स्वरूपात) अपलोड करणे अनिवार्य राहील.

२. भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय दबाव आणल्यास किंवा गैरप्रकार केल्यास उमेदवारास तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

३. मदतकक्ष (Help Desk): ई-मेल dudaakola@gmail.com वर संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी कार्यालय सत्यमेव जयते अकोला

सह आयुक्त
न. पा. प्र. विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय अकोला

TCS हेल्पलाईन क्र:+९१९५१३६३१७१३ *(सोमवार ते शुक्रवार कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत)*

४. नोट- वरील पदभरती प्रक्रीयेतील पदांमध्ये बदल, आरक्षणात बदल,किवा पदे कमी कीवा जास्त करणे तसेच ऐनवेळी जाहीरात, भरती प्रक्रीयेला स्थगिती किवा भरती प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत. त्यासाठी उमेदवारांनी भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: अकोला

दिनांक: २६ / ११ / २०२६

(डॉ.विश्वनाथ वडजे)
सहआयुक्त, नगरपालिका प्रशासन
तथा सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

जिल्हाधिकारी कार्यालय
सत्यमेव जयते
अकोला

(श्रीमती वर्षा मीना, भा.प्र.से.)
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा
जिल्हाधिकारी, अकोला